जा.क्र. ८७५/वानिशा/वपोनिशिक्षण/गणेशोत्सव/२०१५.
पोलीस उप आयुक्त (शहरे) तथा
प्राचार्य, वाहतूक प्रशिक्षण संस्था, यांचे कार्यालय
भायखळा, मुंबई ४०० ०२७.
दिनांक :– ०८/०८/२०१५.

प्रति,

प्रभारी अधिकारी
एन.एस.एस. को–ऑरडीनेटर युनिट,
व्ही.व्ही. भवन, दुसरा माळा, बी.रोड,
चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०.

विषय :– गणपती विसर्जनादिवशी एन.एस.एस. छात्र बंदोबस्ताकरीता नेमणेबाबत.

यावर्षी गणेशोत्सव दि. १७/०९/२०१५ ते २७/०९/२०१५ या कालावधीत साजरा होत आहे. मागील वर्षी आपल्या युनिटच्या छात्रांनी गणपती विसर्जनाच्या वेळी महत्वाची कामगिरी बजावली होती. त्यामुळे वाहतूकीवर व पादचाऱ्यांवर नियंत्रण योग्य प्रकारे करण्यात येऊन वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली.

यावर्षी दि. १८/०९/२०१५, २१/०९/२०१५, २३/०९/२०१५ आणि दि. २७/०९/२०१५ रोजी अनुक्रमे दिड दिवस, गौरी गणपती व पाचवा दिवस, सातवा दिवस आणि अनंत चतुर्दशी निमित्त मोठया प्रमाणावर श्रींच्या मुर्तीचे विसर्जन होणार आहे. त्यावेळी भाविकांची प्रचंड गर्दी होणार आहे. गणपती विसर्जना दिवशी दुपारी १४.०० वा. पासून ते विसर्जन संपेपर्यंत आपल्या अधिपत्याखालील एन.एस.एस. छात्रांनी सोबत जोडलेल्या यादीतील नमूद प्रभारी पोलीस निरीक्षकांना कृपया रिपोर्ट करणेस सांगण्यात यावे.

नेमणूक करण्यात आलेल्या छात्रांची संख्या व नावे प्रभारी पोलीस निरीक्षक, शिक्षण विभाग, वाहतूक, वाहतूक प्रशिक्षण संस्था इमारत, ३ रा माळा, हंस राज लेन, भायखळा, मुंबई यांच्या कार्यालयास १५ दिवस आधी कळविण्यात यावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.

Prof D. G. Phadkem
11.8.15

( अनिल कुंभारे )
पोलीस उप आयुक्त( शहरे )तथा
प्राचार्य,वाहतूक प्रशिक्षण संस्था,
वाहतूक, भायखळा, मुंबई.

N. S. S. UNIT
RECEIVED: By hand
DATE: 11/08/2015
INWARD NO.: 303
FILE NO.: